# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

**Email ID – sp.hingoli@mahapolice.gov.in, Contact No.-8669900676**

**Date - 18/ 06/2022**

### अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १७/०६/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १८७ वाहन चालकाविरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचेकडुन १,०७,७५०/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

### जिल्हा पोलीस दलातर्फे महिला विषयक जनजागृतीपर जननी सुरक्षा कार्यक्रम :—

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली श्री.एम.राकेश कलासागर यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात पोलीस दलाकडुन महिला व बालकां संबंधि होणारे अन्याय व अत्याचार थांबले पाहिजेत .महिलां व बालकांना त्यांच्या सुरक्षे संबंधि कायदे व नियम यांचे माहिती होवुन त्यांच्यात जनजागृती व्हावी या व्यापक हेतुने जननी हा कार्यक्रम संपुर्ण जिल्हयात राबविण्यात येत आहे.